# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 38) 15th January 2013 (No. of Pages 8) ( No : 01


**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

( [illegible] )

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला

# आंदोलन तिव्र करण्याबाबतचा ठराव

**(१) विद्यमान आंदोलनाबाबतचा पहिला ठराव** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झाला व तो लागलीच मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सोमवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०१२ रोजी पुणे येथील बैठकीत **दुसरा ठराव** सम्मत झाला व तो लागलीच मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सोमवार, दिनांक १० डिसेंबर २०१२ रोजी नागपूर येथील बैठकीत आंदोलनाबाबतचा **तिसरा ठराव** सम्मत झाला व तो लागलीच मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आला. **परंतु गेल्या तीन, चार महिन्यामध्ये कोणत्याही प्रकारची औपचारिक चर्चा सुद्धा करण्याची कृति उच्च शिक्षण विभागाकडून झालेली नाही.** संघटनेच्या असे लक्षात आले आहे की, वरिष्ठ अधिकारी सातत्त्याने विभागाच्या राज्यमंत्र्यांना, मंत्र्यांना, मुख्यमंत्र्यांना व मंत्रिमंडळालासुद्धा असत्य माहिती पुरवित आहेत. काही आवश्यक व महत्वाची माहिती लपवून ठेवण्याचा प्रयत्न सुद्धा ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्याकडून सातत्त्याने होत आहे असे दिसून येते.

**(२.१)** दिनांक १७ डिसेंबर २०१२ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर अधिवेशनात या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये (यापुढे उल्लेख "उक्त चर्चा" असा) मा. उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री यांनी एकदा "२ मे रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी आम्ही प्राध्यापकांना हेच सांगितले होते की, याबाबतीत शासन **सकारात्मक विचार** करील" असे उद्गार काढले. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा "सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी **सकारात्मक विचार** केला जाईल असे म्हटले होते." असे उद्गार काढले व त्यानंतर पून्हा तिसऱ्या वेळी "मी सांगितल्याप्रमाणे येत्या तीन महिन्यांमध्ये शासनातर्फे **सकारात्मक निर्णय** घेतला जाईल." असे उद्गार काढले. "**सकारात्मक निर्णय**" किंवा "**सकारात्मक विचार**" हे शब्द अत्यंत मोघम असून त्याचे अनेक प्रकारे अर्थ काढता येतात. मा. मुख्यमंत्र्यांशी २ मे २०१२ रोजी झालेल्या चर्चेत अशा प्रकारची मोघम शब्दरचना अजिबात वापरण्यात आलेली नव्हती, तर अत्यंत काटेकोर व ठाम अशा शब्दरचनेत मा. मुख्यमंत्र्यांनी आपले विचार मांडले होते. **प्रत्यक्षात मा. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत काय ठरले होते ही गोष्ट सभागृहात चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यांपासून लपवून ठेवण्यात आली होती हे आता स्पष्टपणे दिसून येत आहे.**

**(२.२)** याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की. "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन **सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत.**" असे स्पष्टपणे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी व मा. उच्च शिक्षण सचिवांनी मा. मुख्यमंत्र्यांना त्या बैठकीत सांगितले. त्याची कार्यवृत्तात नोंद आहे. फोनवरुन मा. उच्च शिक्षणमंत्री व उच्च शिक्षण सचिव यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांशी काय चर्चा झाली? हे सुद्धा या कार्यवृत्तात पुढील शब्दात नमुद केले आहे. :-

"या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट ही संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना

**सोमवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ या दिवसापासून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विद्यापीठामार्फत, संचालित केल्या जाणाऱ्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील परीक्षेच्या कोणत्याही कामाशी संपूर्णपणे असहकार करतील**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ८ पहा)*

नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन **सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला.**"

**(२.३)** एवढ्या साऱ्या बाबी या कार्यवृत्तात नमुद केल्यानंतर मा. मुख्यमंत्र्याचे आदेश काटेकोर शब्दात नमुद करण्यात आलेले आहेत. ते शब्द पुढील प्रमाणे :- **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यांपासून हे कार्यवृत्त लपवून ठेवण्यात आले होते. ही गोष्ट उघड आहे व त्यामुळेच त्यांनी "सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले" या काटेकोर शब्दरचनेऐवजी "सकारात्मक विचाराचा" मोघम विचार सभागृहात मांडला हे स्पष्टपणे दिसून येते.

**(३.१)** विधानपरिषदेतील उक्त चर्चेमध्ये उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यांनी **मुदतबंद पूर्ततेबाबत** एकदा "परंतु आता ही बाब आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणू आणि येत्या **३ महिन्यामध्ये याबाबत निर्णय होईल** एवढे मी सांगू इच्छितो" असे सांगितले व पून्हा एकदा "मी सांगितल्याप्रमाणे **येत्या तीन महिन्यांमध्ये** शासनातर्फे सकारात्मक निर्णय घेतला जाईल." असेच सांगितले. यावरून वचनपूर्तीबाबतची पूर्वस्थिती तसेच यापूर्वी देण्यात आलेली मुदतबंद आश्वासने चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती हे सुद्धा स्पष्टपणे दिसून येते.

**(३.२)** नागपूर विद्यापीठातील जवळ जवळ ६०० नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या नेमणूकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २००८ मध्ये मान्यता दिली होती. एकदा अशी मान्यता झाल्यानंतर **पहिल्या दिवसापासून त्यांची सेवा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ग्राह्य धरावीच लागते.** याची माहिती असलेल्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषद सभागृहामध्ये पुढील प्रमाणे मुदतबंद आश्वासने दिलेली होती. "सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जे तीन प्रश्न विचारलेले आहेत त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे. **तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी. आर. काढण्यात येईल. जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.** आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते, तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरच हा जी. आर. काढण्यात येईल. त्याचबरोबर अधिव्याख्यात्यांना नियमित करण्याचे विद्यापीठाचे काम सुरु आहे. विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे** अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल." ही मुदतबंद आश्वासने चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती हे सुद्धा स्पष्टपणे दिसून येते.

**(३.३)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत काही निर्णय झाले होते. त्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे.:-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) **वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील ......** याबाबत इतर कार्यवाही शासन पत्र दिनांक ३१ जुलै, २००९ व ४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रातील परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल." **पण विद्यापीठ अनुदान आयोगाचा अंतिम निर्णय आल्यानंतरसुद्धा प्रत्यक्षात याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही.** ३१ जूलै २००९ च्या पत्रान्वये शासनाने संघटनेला असे कळविले होते की "**विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.**" या मुदतबंद आश्वासनाबाबत आपण प्रत्यक्षात शासन म्हणून काहीही कारवाई केली नाही ही गोष्ट मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती हे स्पष्टपणे दिसून येते.

**(३.४)** राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या निदेशावरून उच्च शिक्षण विभागाने दिनांक १५ मे २०१२ रोजी या संघटनेच्या अध्यक्षांना पत्र पाठवून पुढील प्रमाणे कळविले :- "**विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या वरील पत्रात नमुद केल्यानुसार दि. १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट सेट अध्यापकांच्या वरीलप्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती बाबत व त्याअनुषंगाने येणाऱ्या थकबाकी संदर्भात माहे जून, २०१२ अखेर पर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल व त्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.**" **मात्र प्रत्यक्षात याबाबत शासन म्हणून आपण कोणतीही कारवाई केली नाही.** ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती हे सुद्धा स्पष्टपणे दिसून येते.

**(३.५)** दिनांक २ एप्रिल २०१२ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक २५५८५ वरील अनुपुरक चर्चेमध्ये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी स्पष्टपणे "**सभापती महोदय, या प्रश्नाबाबत शासनाकडून पुढील अधिवेशनाच्या अगोदर निर्णय घेण्यात येईल.**" असे आश्वासन दिले. **पण पुढचे व त्यांच्या**

***परंतु असे की मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची तिव्रता लक्षात घेता मराठवाडा विभागातील दोनही विद्यापीठांना हा निर्णय लागू असणार नाही. तथापी, उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी आढ्यतेची व ताठरपणाची भूमिका घेतली व मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची अवहेलना करण्याचेच त्यांचे धोरण सुरु राहिले तर मराठवाड्यातील संलग्न संघटनासुद्धा अल्प सूचनेने या आंदोलनात सहभागी होतील.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ८ पहा)*

**पुढचे अधिवेशन संपले पण याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही.** ही बाब चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती हे सुद्धा स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळेच आता नागपूर अधिवेशनामध्ये लक्षवेधी सुचनेवरील अनुपूरक चर्चेमध्ये दिनांक १७ डिसेंबर २०१२ रोजी मा. उच्च शिक्षण राज्यमंत्र्यांनी "परंतु आता ही बाब आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणू आणि **येत्या ३ महिन्यामध्ये याबाबत निर्णय होईल** एवढे मी सांगू इच्छितो." असे व त्यानंतर " मी सांगितल्याप्रमाणे येत्या **तीन महिन्यांमध्ये** शासनातर्फे सकारात्मक निर्णय घेतला जाईल." **अशी जूनी सर्व आश्वासने मोडीत काढणारी नवी आश्वासने दिलीत.**

**(४.१)** उक्त चर्चेमध्ये सहभागी होतांना मा. राज्यमंत्र्यांनी एकदा **"सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले की, कोणत्या तारखेपासून नेट-सेट लागू करावयाचे हा सुद्धा कॅबिनेटचा निर्णय राहील."** असे उद्‌गार काढले. त्यानंतर पुन्हा "**युजीसीने जरी सांगितले असले तरी** आम्ही नक्कीच याबाबतीत सकारात्मक विचार करीत आहोत." असे उद्‌गार काढले व आणखी पुन्हा एकदा तिसऱ्यांदा "युजीसीने सांगितल्याप्रमाणे त्या तारखेपासून जर त्यांना सवलत द्यावयाची असेल तर त्याप्रमाणे आपल्याला बजेट प्रोव्हीजन करावी लागणार आहे. **हा केवळ कॅबिनेटचा निर्णय असणार आहे.**" याबाबतचा निर्णय कॅबिनेटनेच घ्यावयाचा असतो याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. मात्र असा निर्णय घेतांना या देशाच्या घटनेने घातलेली बंधने कोणालाही झुगारता येत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय हे याबाबतीत एक महत्वपूर्ण बंधन आहे, ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यांपासून लपवून ठेवण्यात आल्याचे उघड दिसून येत आहे. मा.राज्यमंत्र्यांनी काढलेले हे उद्‌गार लक्षात घेता अनेक गोष्टी मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आल्या हे स्पष्टपणे दिसून येते. एक म्हणजे राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबत निश्चित आदेश दिलेले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे (तसेच) करण्याचे हे त्यांचे आदेश आहेत. ही गोष्ट जशी मा. राज्यमंत्र्यांपासून लपवून ठेवण्यात आली त्याप्रमाणेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विपरित निर्णय राज्यशासनाला घेता येत नाही ही संघटनेने वारंवार निवेदनाच्याद्वारे शासनाच्या लक्षात आणून दिलेली बाब सुद्धा विधानपरिषदेत चर्चेला सामोरे जाणाऱ्या राज्यमंत्र्यांपासून लपवून ठेवण्यात आली असे दिसून येते.

**(४.२)** याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झमशन बाबत एकदा आपल्या ११ मे २०१२ च्या पत्रान्वये राज्य शासनाला "The factual position on the subject is given as under :- **The actual date of grant of exemption** shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000. " असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ.) : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ पूढील प्रमाणे आहे.:-

" 24.... As analyzed above, therefore the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval, in which event it would if it failed to show cause for it's failure to abide by the said Regulations to the satisfaction of the UGC, forfeit its grant from the U.G.C. If however it did show cause to the satisfaction of the U.G.C., **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized."** *(P 316 of NB 2001)* थोडक्यात सांगावयाचे तर विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट-सेट मुक्ततेबाबत एकदा मान्यता मिळाली की या शिक्षकांच्या सेवा तर नियमित होतीलच पण **त्यांच्या वेतनावरील केंद्राचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुज्ञेय अनुदान सुद्धा त्यांना मिळेल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे व भारतात आज हा या विषयावरील अंतिम शब्द आहे.** शब्दशः पुढील प्रमाणे :- "..... it not only would not forfeit its grant but the appointment made **without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized."**

**(५.१)** "कोणत्या तारखेपासून नेट-सेट लागू करावयाचे हा सुद्धा कॅबिनेटचा निर्णय राहील." असे उद्‌गार उक्त चर्चेमध्ये काढणाऱ्या **मा. राज्यमंत्र्यांपासून कागदोपत्री नमुद असलेल्या किती गोष्टी लपवून ठेवण्यात आल्या त्याची नुसती यादी नजरेखालून घातली तरी अशी लपवाछपवी करणाऱ्या अधिकाऱ्यांविषयीचा शिक्षण क्षेत्रातील तिरस्कार शतगुणीत होतो याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.**

**(५.२)** मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत काही निर्णय झाले होते. त्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे.:-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) **वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.**" ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती असे आता ठामपणे म्हणता येते.

**(५.३)** "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन **सदर अध्यापकांच्या सेवा**

### मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत

## "सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."

### तर मग नक्की अडले कुठे?

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ७.१३ ते ७.१६ पहा)*

**नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत."** असे स्पष्टपणे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी व मा. शिक्षण सचिवांनी मा. मुख्यमंत्र्यांना त्या बैठकीत सांगितले. त्याची कार्यवृत्तात नोंद आहे. असे आपण लेखी अभिवचन दिले आहे ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती असे आता ठामपणे म्हणता येते.

**(५.४)** "या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट ही संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन **सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला."** एवढ्या साऱ्या बाबी या कार्यवृत्तात नमुद केल्यानंतर मा. मुख्यमंत्र्याचे आदेश काटेकोर शब्दात नमुद करण्यात आलेले आहेत. ते शब्द पुढील प्रमाणे :- **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती असे आता ठामपणे म्हणता येते.

**(५.५)** याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झमशन बाबत एकदा आपल्या ११ मे २०१२ च्या पत्रान्वये राज्य शासनाला "The factual position on the subject is given as under :- **The actual date of grant of exemption** shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000. " असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. (Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ.) : AIR 1995 SUPREME COURT 336) ही गोष्ट चर्चेला उत्तर देणाऱ्या मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली होती असे आता ठामपणे म्हणता येते.

**(५.६)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाबाबतची व इतर उपरोक्त वस्तुस्थिती ही जशी मा. राज्यमंत्र्यापासून लपवून ठेवण्यात आली तसेच ही गोष्ट मंत्रिमंडळापुढे सादर करावयाच्या टिप्पणीमध्ये सुद्धा लपवून ठेवण्यात आलेली आहे. सादर करण्यात आलेली नाही.

**(५.७) आणखी महत्वाची बाब म्हणजे** नेमणूकीच्या पहिल्या तारखेपासून नेटसेटमुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित केल्यावर सन १९९१ ते सन १९९८ या कालखंडात एक रुपयाचा सुद्धा जादा अर्थभार निघत नाही या महत्वपूर्ण बाबीचा उल्लेख मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावयाच्या टिप्पणीमध्ये नाही हे आता उघड झाले आहे.

**(५.८) आणखी असे की** वरिष्ठ व निवडश्रेणी प्रदान केल्यामुळे १ जानेवारी २००६ पासून तर पुढच्या ५ वर्षासाठी येणाऱ्या जादा अर्थभाराच्या ८० टक्के रक्कम केंद्र शासन अदा करणार आहे याबाबीसुद्धा मंत्रिमंडळाच्या टिप्पणीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत, हेही आता उघड झाले आहे.

**(६)** सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत तर उच्च शिक्षण विभागाने कमालच केलेली आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च

*उपरोक्त आंदोलन तिव्र करण्याची 'सुरुवात-सूचना' म्हणून गुरुवार, दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी त्या त्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मा. कुलगुरुच्या मार्फत राज्य शासनाला निवेदन सादर करतील.*

*एक रुपयाचे अनुदान मिळत नसतांना १७ लाख कर्मचारी, शिक्षक व सेवानिवृत्त प्राध्यापकांना ८० टक्के थकबाकी आतापर्यंत अदा करण्यात आलेली असतांना व येथे ८० टक्के अनुदान केंद्र शासन देत असतांना, कार्यरत मा. कुलगुरु, प्रकुलगुरु, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सातत्याने अवमानित केले जात आहे,*

**हे एक व दुसरे म्हणजे**

*नेटसेटच्या बाबत सर्वोच्च न्यायालयाचा न्यायीक निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाचा अंतिम निर्णय या दोन प्रश्नाबाबत कुलगुरु या नात्याने विद्यापीठाची काय भूमिका आहे हेहि त्यांनी शासनाला कळवावे अशी त्यांना विनंती करण्यात येईल.*

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १ पहा)*

*''कोणत्या तारखेपासून नेट-सेट लागू करावयाचे हा सुद्धा कॅबिनेटचा निर्णय राहील'' असे उद्‌गार उक्त चर्चेमध्ये काढणाऱ्या मा. राज्यमंत्र्यांपासून कागदोपत्री नमुद असलेल्या किती गोष्टी लपवून ठेवण्यात आल्या त्याची नुसती यादी नजरेखालून घातली तरी अशी लपवाछपवी करणाऱ्या अधिकाऱ्यांविषयीचा शिक्षण क्षेत्रातील तिरस्कार शतगुणीत होतो याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.*

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ५.१ पहा)*

व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात पहिलाच परिच्छेद पुढील प्रमाणे आहे.:-

"केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**" या आश्वासनाची कोणतीही अम्मलबजावणी करण्यात आली नाही. आता तर केंद्र शासनाने दिनांक १४ ऑगस्ट २०१२ रोजी शासन निर्णय (No. F. 1-7/2010-U.Il) काढून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना (नेट-सेट मुक्त शिक्षक धरून) १ जानेवारी २००६ पासून पुढील ४-५ वर्षासाठी नवीन वेतनश्रेणीच्या थकबाकीपोटी येणाऱ्या रकमेच्या ८० टक्के रक्कम अंशदान म्हणून महाराष्ट्र शासनाला देऊ केली असतांना शिक्षकांविषयी उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीच्या मनात असलेल्या आकसपूर्ण भावनेमुळे अजूनही याबाबतची अम्मलबजावणी झालेली नाही.

**(७)** वर नमुद केलेल्या बाबींची माहिती योग्य स्तरावर न देण्याचे व मुख्य म्हणजे या सर्व बाबी मंत्रिमंडळासमोर सादर केलेल्या टिप्पणीमध्ये समाविष्ट नसतील तर त्यातून काय निर्णय समोर येणार हे उघडच आहे.

मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अभिवचनाचा आदर करुन या महासंघाने दिनांक १८ मे, २०१२ रोजीच्या ठरावान्वये गेल्यावेळी आंदोलन एकतर्फी मागे घेतले होते त्याबद्दल शिक्षकांवर सुड उगविण्याचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा कोणताही अधिकार फेटाळून लावण्यात येत आहे व अशा विचारांचासुद्धा तिव्र धिक्कार करण्यात येत आहे.

**उच्च शिक्षण खात्याच्या उपरोक्त आकसपूर्ण धोरणामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला आंदोलन तिव्र करण्याचा कार्यक्रम घोषित करावा लागत आहे याचे या महासंघाला मनापासून दुःख होत असले तरी याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नसल्यानेच हा कार्यक्रम घोषित करण्यात येत आहे.**

**(८)** सोमवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ या दिवसापासून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विद्यापीठामार्फत संचालित केल्या जाणाऱ्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील परीक्षेच्या कोणत्याही कामाशी संपूर्णपणे असहकार करतील.

परंतु असे की मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची तिव्रता लक्षात घेता मराठवाडा विभागातील दोनही विद्यापीठांना हा निर्णय लागू असणार नाही. तथापी, उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी आढ्यतेची व ताठरपणाची भूमिका घेतली व मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची अवहेलना करण्याचेच त्यांचे धोरण सुरु राहिले तर मराठवाड्यातील संलग्न संघटनासुद्धा अल्प सूचनेने या आंदोलनात सहभागी होतील.

**(९)** उपरोक्त आंदोलन तिव्र करण्याची 'सुरुवात-सूचना' म्हणून गुरुवार, दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी त्या त्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मा. कुलगुरुच्या मार्फत राज्य शासनाला निवेदन सादर करतील.

एक रुपयाचे अनुदान मिळत नसतांना १७ लाख कर्मचारी, शिक्षक व सेवानिवृत्त प्राध्यापकांना ८० टक्के थकबाकी आतापर्यंत अदा करण्यात आलेली असतांना व येथे ८० टक्के अनुदान केंद्र शासन देत असतांना, कार्यरत मा. कुलगुरु, प्रकुलगुरु, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सातत्याने अवमानित केले जात आहे, **हे एक व दुसरे म्हणजे** नेटसेटच्या बाबत सर्वोच्च न्यायालयाचा न्यायीक निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाचा अंतिम निर्णय या दोन प्रश्नाबाबत कुलगुरु या नात्याने विद्यापीठाची काय भूमिका आहे हेहि त्यांनी शासनाला कळवावे अशी त्यांना विनंती करण्यात येईल.

**(प्रा. शिवाजीराव पाटील)**
*अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)**
*सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

******

*मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अभिवचनाचा आदर करुन या महासंघाने दिनांक १८ मे, २०१२ रोजीच्या ठरावान्वये गेल्यावेळी आंदोलन एकतर्फी मागे घेतले होते त्याबद्दल शिक्षकांवर सुड उगविण्याचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा कोणताही अधिकार फेटाळून लावण्यात येत आहे व अशा विचारांचासुद्धा तिव्र धिक्कार करण्यात येत आहे.*

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ७ पहा)*

# The Question of Pension

**BY K.K. THECKEDATH,**

*former President, AIFUCTO*

We are celebrating today the fiftieth anniversary of the formation of the AIFUCTO way back in 1962. One of the leading federations in the country, we have many reasons to celebrate the achievements of this organization. What is most widely noted is **the AIFUCTO mobilization of over 400,000 college and university teachers of India in two strikes in 1987 and in 1998, both of which led to great advances in the status and working conditions of the teachers.**

While the breadth of the movement is recognized and hailed universally, what is not appreciated enough is the AIFUCTO's commitment to the problems of those who are not yet vocal or organized in powerful groups within the movement, like the librarians or the directors of physical education who would number only about 1% of the teaching community. Another section of teachers that the AIFUCTO is concerned about are the young entrants to the profession who joined after the year 2004. These make up about 20 % of the numbers today. **These members are outside the pale of the pension scheme.**

As an old soldier of the AIFUCTO I would commend for celebration the initiative of the AIFUCTO among six all India federations for a movement to restore the pension scheme. The other five organizations were the All India State Govt Employees Federation (AISGEF), the Confederation of Central Govt Employees, All India Defence Employees Federation, the BSNL Employees Union, and the School Teachers Federation of India. **A national convention was organized in Delhi on 22nd July 2011, and a countrywide movement was launched for pension protection.**

**Background**

**Following the Russian Revolution there were sweeping changes in the working conditions of the people of that country.** These included social security, old age pensions, eradication of illiteracy, and universal health care. The working people all over the capitalist world had seen this. In the backdrop of the Great Depression (1929-33) with huge unemployment in the USA and other countries, people rose up in movement for jobs and social security. **It was in 1935 during the presidency of Franklin Roosevelt that a scheme of pension on the basis of guaranteed/defined benefits was introduced in the USA.** This was on the lines of the pension scheme in the USSR.

In the "Second Slump" of the world capitalist system post 1972, with profit rates plunging for all industries, Marx's prediction in Vol III of Capital about the falling rate of profits and the shift of investments from production activities to speculative activities came into play. Finance capital with its dominant speculative thrust was globally pushing for investments in the share markets and the new derivatives trade. The pension funds became the targets for unleashing huge cash reserves. **With each recession in the world economy, the cry became more strident for the access to pension funds. The euphemism was "to liberate pension funds" for better returns.**

Finally, in 1994 the World Bank itself came out with its document on the *Problem of Old Age,* recommending to all countries the shifting of security to a market oriented contributory scheme, **where the contributions of the employee would be defined, but the benefits themselves would remain undefined and linked to the stock market at the time of the employee's retirement.**

The 2008 US financial meltdown and the collateral crises all over the advanced capitalist world resulted in corporate insolvencies. These were dutifully absorbed by the respective nation states. **Many of these states have now themselves become insolvent, corporate insolvencies being converted to sovereign insolvencies,** and they have had to run to the IMF or the EU for succour. Whether it is the IMF or the EU, the creditors of these states are demanding that austerity measures be adopted at home. The working conditions of the people are under attack. The first attack is on pensions.

**The Indian Situation**

In India, the government has withdrawn the pension benefits of all employees post 2004. Many states in the Union have followed suit by introducing their own contributory schemes, **where only the contributions are defined and not the retirement benefits.** The only honourable exceptions were the three left ruled states of West Bengal, Tripura and Kerala. With Kerala recently electing a Congress govt. this state has also backed out of the pension scheme.

**In the state of Maharashtra the govt has stopped pensions from the year 2005,** and has issued an order bringing all its employees and teachers in aided institutions under a contributory scheme, where the contribution from each employee is 10% of her wage, and the choice of return depends on her investment in one or more of four different schemes in her personal account. There is no social commitment to security, since each employee has a separate account linked to the equity choice made.

**The Pension Fund Fraud**

**In a hard hitting speech by Shri R.G.Karnik**, president of the AISGEF, to a gathering of new teachers from primary to university levels in Mumbai on 1st December 2011, he termed the government scheme as a fraud. **While money was being collected from the employees and teachers right from the year 2005, no Authority has been set up so far to manage the scheme.** Also, to date, the govt has not made any contribution to this fund. What has happened to the millions of rupees collected from the employees on this account, he asked. He also pointed out that the orders specifically rule out GPF or provident fund for these employees and teachers.

**At the same meeting Shri Sunil Joshi,** president of the state government employees union of Mumbai, stated that pension was a social security for a time when the employee is no longer able to work. It is a humane scheme in a society where the old are neglected and left to fend for themselves. **If the Union govt thinks that the new scheme is good enough, then why have they retained pensions in the armed services?** The answer is obvious. Young citizens would not join the forces if the present wages are not supported by a guarantee of pension, provident fund and gratuity (the Triple benefit Scheme).

In fact the Supreme Court of India had ruled in the

cases of D.S.Nakara (1976-3 SCR 360 and AIR 1983 SC 130) that **there could be no discrimination between employees on the basis of the date of appointment.** In 1971 the Supreme Court had ruled that "pension was not a bounty payable on the sweet will of the govt" but was a right of the employee.

**The Young Teachers of Maharashtra**

The present young teachers of Maharashtra appointed after 2005 are not aware of the fact that, under the Govt orders (GR dated 25-3-2011), the provision of General Provident Fund is not available to them as per para 2 d of the GR. Further, even though these teachers have signed the appended Form-1 of page 12 of the GR, **no Record Keeping Authority has so far been appointed by the Government.** The Govt is collecting 10% of the Wages every month, and also an equal amount as arrears from 2005, but has not made a matching contribution to the fund. What will happen in the unfortunate circumstance that a concerned teacher dies?

This is the state of affairs as far as the question of social security of teachers who joined as long ago as seven years is concerned. This has to be a top concern of all teachers' unions.

While celebrating the work and achievements of the AIFUCTO we must hail the initiative of the AIFUCTO in forming a broad front to fight for pensions. It may be mentioned that in its memorandum to the Govt of India while giving a notice for strike in January 2009, the **AIFUCTO had referred to the recommendation of the Chedda Committee that the Triple Benefit scheme should be extended to teachers appointed after 2004.** It is another matter that the Govt issued the pay revision orders and so the strike was averted. But the commitment of the AIFUCTO to the younger generation is to be remembered.

**We on our part as inheritors of the values of this great organization should put our shoulders to the resolution of this important issue.** Once and for all we should solve for the new generation the question of old age security and pension.

*****

( [illegible] )

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

# MOVEMENT RESOLUTION

## ADOPTED BY GENERAL BODY IN VARANASI CONFERENCE

**15th to 17th December, 2012**

**The AIFUCTO salutes** the visionary leaders who founded and nurtured this historic organization and sacrificed their lifetime for the cause of teachers, students, public and higher education. The AIFUCTO has reached the landmark height only through the generation s of leaders' selfless & tireless efforts.

**The AIFUCTO congratulates** the organizers, the Mahatma Gandhi Kashi Vidyapith College Teachers'Association for the fabulous success of the Golden jubilee programs & the 28th Academic conference in Varanasi,the birth place of the AIFUCTO.We record our most sincere appreciation of their utmost commitment to make the program a grand success and for taking care of minute details and ensuring flawless accommodation, superb food stuffs and warmest hospitality.

**The Program included a seminar** on "Higher Education in 12th Five Year Plan, The Agenda, and Roles of teachers & Teachers' Movement". More than twenty erudite papers have been presented by leaders as well as members.Prof.Sudhanshu Bhusan, Head, Higher Education, NUEPA, New Delhi presented a brilliant Key note Address. His was a remarkable analysis of the Plan agenda and the necessity to make the program effective. The Conference congratulates the speakers and participants.

The AIFUCTO in its General council meeting held on 15th, 16th and 17th December, 2012, **deliberated on various issues** concerning higher education in the States and

**The Conference strongly opposed** the ad-hocism in higher education reflected in the appointment of part time, contractual and guest teachers and not filling the vacant posts for years. The AIFUCTO also strongly opposed growing privatization in higher education, and deplored the plight of teachers in private institutions, most glaring in the private engineering colleges. **The Conference reiterated our professional demands including CAS, and payment of arrears by States.**

**The Conference resolved to continue to oppose the PFRDA bill,** the educational bills including Foreign university Bill pending before Parliament. It condemned the non-inclusion of teachers' bodies in taking policy decisions and the arrogant decision of GOI in presenting FDI Bill in Parliament. The speakers poured their disapproval and anger against the Government's intransigent attitude in these matters. The AIFUCTO reiterated the necessity of a united movement against the retrograde policies of state & Central governments. The Conference, in its conclusion resolves to adopt appropriate action program to be deided by the NEC and to be held in Delhi & state capitals to stall the retrograde moves of the govt. both inside and outside Parliament.

**The AIFUCTO demanded** that the Government consult, without fail, the Organization before framing any policy on higher education.

**The Conference also resolved to support and participate** in the nation wide strike in February, 2013 called by the central Trade unions opposing various neo-liberal policies of government of India resulting in price rise, curtailing trade union rights and downsizing or abolition of social security schemes.

**The Conference resolved** to take forward its glorious 50 years Journey for the cause of public funded higher education which is the only custodian of the poor and downtrodden.

** AF : P 01 **

***Dearness Relief on Pension/Family Pension 72% from 1st July, 2012***

**GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT**

**GOVERNMENT RESOLUTION, : NO.DRP-2012/CR.90/SER-4,**

Mantralaya, Mumbai- 400 032, dated : 9.11.2012

**Read**- Government Resolution, Finance Department, No. DRP- 2012/CR.41/SER-4 dated 17th April, 2012 and 12th July, 2012.

# RESOLUTION

Government is pleased to decide that dearness relief with effect from 1st July, 2012 to the State Government pensioners/ family pensioners on their Basic Pension/Family Pension and Dearness pension/ Dearness family pension If any) will be enhanced from 65 % to 72 %. Dearness relief will be payable in cash from 1st November, 2012. The orders regarding payment of arrears with effect from 1st July, 2012 to 31st October, 2012 will be issued separately.

2. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

3. Government is also pleased to direct that above decision should, **mutatis mutandis,** apply to those employees including family pensioners of **Recognised and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.**

4. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961(Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

5. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/autonomous body/Local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No. COP1099/306/SER-4, dated 15th November 1999 will also be entitled to the payment of dearness relief on full pension as per the provision of Government Resolution, Finance Department, No. COP-1001/50/SER-4, dated 9th April 2001, at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 above.

6. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

7. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, ***mutatis mutandis,*** apply to the dearness relief now sanctioned.

8. This Government Resolution is available on the web site of Government of Maharashtra i.e.-"www.maharashtra.gov.in" and its computer code number is 201211091606121705.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**R.A.Nagargoje**
Under Secretary to Government

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 ** FS : P 05 **

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै, २०१२ पासून सुधारणा करण्याबाबत.....*

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग***

***शासन निर्णय क्रमांक मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा- ९***

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : दिनांक : ८ नोव्हेंबर, २०१२**

**संदर्भ** :- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-१११२/प्र.क्र.१५/ सेवा-९, दिनांक ९ एप्रिल, २०१२ आणि १० जुलै, २०१२

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जुलै, २०१२ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ६५ टक्क्यांवरुन ७२ टक्के करण्यात यावा. दि. १ नोव्हेंबर, २०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जुलै, २०१२ ते दि. ३१ ऑक्टोंबर, २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च 'संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते' या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२११०७१५१७५५१२०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शि.म.म्हात्रे)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 ** FS : P 01 **

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **19.01.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

-----------------------------------------------

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................